**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक २८/०६/२०२४**

**आरोपी लोकसेवक** 1) श्री अर्जुन गंगाधर खरबडे, वय 44 वर्षे पद गामसेवक (वर्ग-3) राहेगाव ता. वैजापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर **यांनी** तक्रारदार यांच्याकडुन रुपये 10000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या **जाळ्यात**.

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत**प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| **गुन्हा** दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस स्टेशन वैजापुर छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **आरोपी** यांचे नाव व पत्ता | :- | श्री अर्जुन गंगाधर खरबडे, वय 44 वर्षे पद गामसेवक (वर्ग-3) राहेगाव ता. वैजापुर जिल्हा छत्रपती संभाजीनगर, रा. श्री घोडे यांचे घरात, एकनाथ नगर हर्सुल,विजय औताडे यांचे कार्यालयाच्या बाजुला छत्रपती संभाजीनगर |
| **लाच** मागणी रक्कम | :- | 10000/- रुपये. |
| **लाच** स्विकृती रक्कम | | 10000/-रुपये. |
| **सापळा** अधिकारी | :- | श्री. हरिदास डोळ, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| **सह सापळा** अधिकारी | :- | श्री बाळु जाधवर, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| **लाच** मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे व त्यांचे गावातील ईतर 6 लाभार्थी यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मंजुर गाय गोटा बांधकामासाठी झालेल्या खर्चाच्या बिलाच्या मोजमाप पुस्तीकेवर सह्या करण्यासाठी |
| **थोडक्यात** माहिती | | यातील तक्रारदार यांची पत्नी ग्राम पंचायत राहेगाव येथील ग्राम पंचायत सदस्य असुन त्यांचे पती तक्रारदार यांचे व त्यांचे गावातील ईतर 6 लाभार्थी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण राजगार हमी योजना अंतर्गत सन 2023-2024 या आर्थिक वर्षात मंजुर गाय गोटा बांधल्यानंतर झालेल्या खर्चाची बीलाच्या मोजमाप पुस्तिका (एम बी) वर सह्या केल्याचा मोबदला म्हणुन आ.लो.से. श्री अर्जुन खरबडे यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम प्रत्येकी 5000/-एमबी प्रमाणे 30000/- रुपये लाचेची मागणी कली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 20/06/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री अर्जुन खरबडे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष तडजोडी मध्ये प्रत्येकी 3000/- रुपये प्रमाणे एकुण 21000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती पंचा समक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे दि.28/06/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता,आ.लो.से.श्री.अर्जुन गंगाधर खरबडे यांनी पंच साक्षीदारां समक्ष तक्रारदार यांचेकडुन 10000/-रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तक्रारदार यांचे फिर्यादवरुन पो.स्टे. वैजापुर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हरिदास डोळे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, राजेंद्र जोशी, चालक दैठणकर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, |
| पोलीस अधीक्षक | :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103 |
| पोलीस उप अधीक्षक | :- 8668752530 |

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.